## Paper Name : Mumbai Choufer

## Date of Publication : 28th September 2025

Article profiles Principal of R.A. Podar College, Prof. Vinita Pimpale as a dynamic academician, highlighting her roles in exams, IQAC, administration, student-centric innovations, and community initiatives. It also notes her authorship of books and celebrates her as a “Navdurga” symbolizing knowledge, innovation, and social impact.



मुंबई चौफेर

# डॉ. विनीता कृष्णकुमार पिंपळे : शिक्षण, संशोधन आणि नेतृत्वाची तेजस्वी नवशक्ती

***नवरात्रीच्या उत्सवात स्त्रीशक्तीची विविध रूपे जसे देवी स्वरूपात अनुभवायला मिळतात, तसेच समाजात ज्ञान, नेतृत्व आणि समर्पणाच्या माध्यमातून नव्या दिशादर्शकांच्या रूपानेही झळकतात. अशा तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे डॉ. विनीता कृष्णकुमार पिंपळे – ज्यांचा प्रवास शिक्षक, संशोधक, प्रशासक आणि प्रेरणादायी नेत्या अशा सर्वच भूमिकांमध्ये झळकतो.***

**सरस्वतीच्या प्रांगणातील नवदुर्गा**

**– शुभम रेखा शंकर पेडामकर**
**९९६९९६११५७**

डॉ. पिंपळे यांचे शैक्षणिक जीवन हे त्यांच्या चिकाटीचे आणि ध्येयवेडाचे प्रतीक आहे. वाणिज्य शाखेत त्यांनी एसएनडीटी महिला विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता ‘भारतामध्ये वैद्यकीय पर्यटनाच्या संधी व समस्या’. हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि समाजाभिमुख विषय. त्याआधी त्यांनी एम.कॉम., बी.एड., बी.कॉम. तसेच SET परीक्षा उत्तीर्ण करून शैक्षणिक पायाभूत आधार भक्कम केला. संगणक तंत्रज्ञानातील प्रमाणपत्र मिळवून त्यांनी अध्यापनात आधुनिकतेचा स्पर्श आणला.

त्यांची व्यावसायिक वाटचाल श्री चिनाई कॉलेजपासून सुरू झाली, जिथे १६ वर्षे त्या वाणिज्य विभागप्रमुख म्हणून कार्यरत होत्या. २०१० नंतर पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स या नामांकित संस्थेत प्रवेश घेत त्यांनी उपप्राचार्य, परीक्षा नियंत्रक, पदव्युत्तर समन्वयक, IQAC सदस्य अशा महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या सांभाळल्या. २०२५ मध्ये त्यांची प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली आणि संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय विकासात त्यांनी नवे आयाम निर्माण केले.

डॉ. पिंपळे यांनी केवळ अध्यापनापुरतेच योगदान दिले नाही, तर विद्यार्थी विकास आणि संस्थात्मक प्रगती यासाठीही सातत्याने काम केले आहे. त्यांनी तीन नवे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले, सुरक्षित ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी Safe IIT B App अंमलात आणले, तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी केली.

त्यांच्या संशोधन कार्याची व्याप्तीही व्यापक आहे. मुंबई विद्यापीठ मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून त्यांनी ५ संशोधकांना पदवी मिळवून दिली असून, ७ संशोधक सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. ५०पेक्षा अधिक संशोधन निबंध आणि अनेक लघुसंशोधन प्रकल्प हे त्यांच्या कार्याची साक्ष देतात. विशेष म्हणजे आदिवासी महिलांमधील आर्थिक साक्षरता, स्मार्ट पोर्ट इन्फ्रास्ट्रक्चर, शाश्वत विकास आणि वृद्धसेवा यांसारख्या समाजाभिमुख व दूरदृष्टी असलेल्या विषयांवर त्यांनी काम केले आहे.

डॉ. विनीता कृष्णकुमार पिंपळे

अकॅडेमिक क्षेत्रात त्यांनी लिहिलेली दोन पुस्तके - Medical Tourism आणि Lifestyle Pattern and its Impact on Nutrition and Diet on College Students - ही संशोधनाधारित अभ्यासाची जिवंत उदाहरणे आहेत.

संशोधन, अध्यापन, प्रशासन या सर्वच क्षेत्रांमध्ये उत्तुंग यश संपादन करणाऱ्या डॉ. पिंपळे या समाजाशीही घट्ट जोडलेल्या आहेत. NSS कार्यक्रमांद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक उपक्रम, हरित ऊर्जा साधने आणि सामाजिक जागृतीसाठी प्रेरित केले. शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच सामाजिक बांधिलकीही त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे.

त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांसाठी पेटंट दाखल करण्यास प्रोत्साहित करतात. अशा दोन कल्पनांना स्वयंसेवकांनी पेटंट मिळवले आहे. त्यांना वाटते की, ग्रामीण जोड आवश्यक आहे, म्हणूनच दत्तक घेतलेल्या आदिवासी भागात कौशल्य उत्कृष्टता केंद्र उभारणे हा त्यांचा एक स्वप्नप्रकल्प आहे आणि त्या त्यावर कार्यरत आहेत. त्या स्वतः आदिवासी भाग असलेल्या पालघर येथील असल्यामुळे, आदिवासी महिलांना परत काही देणे आणि त्यांना कौशल्यांचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज असल्याचे त्या मानतात.

भविष्यात त्या स्पोर्ट मॅनेजमेंट, लिबरल आर्ट्स अशा नवीन अभ्यासक्रमांची ओळख करून देण्याचे, उद्योग-अकॅडमिक दुव्याला बळकटी देण्याचे तसेच कम्युनिटी कॉलेज स्थापून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत योगदान देण्याचे स्वप्न पाहतात. त्यांची ही दूरदृष्टी त्यांना आधुनिक शिक्षणक्षेत्रातील खऱ्या अर्थाने मार्गदर्शक नेत्या बनवते.

नवरात्रीच्या या पर्वावर, जेव्हा आपण स्त्रीशक्तीच्या विविध रूपांचे स्मरण करतो, तेव्हा डॉ. विनीता पिंपळे यांचे व्यक्तिमत्त्व नवदुर्गेच्या नवशक्तीप्रमाणेच आपल्याला प्रेरणा देणारे ठरते. ज्ञान, संशोधन, नेतृत्व आणि सामाजिक जबाबदारी यांचा अद्भुत संगम साधत त्या शिक्षणविश्वात एक दीपस्तंभासारख्या झळकत आहेत.

Mumbai Choufer
28 Sep 2025 -Page 4